## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
### (सकाळ)

जा.क्र. ३१४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २०/०६/२०१८

**१) रेल्वे ट्रॅक वरील असलेल्या उपरी उपसर ताब्यांच्या ताराची चोरी :—**

दिनांक १८/०६/२०१८ चे १९.०० ते १९/०६/२०१८ चे ११.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हे रेल्वे विभागाचे ईलेक्ट्रीक विभागात ज्युनियर इंजीनीयर पदावर कार्यरत असुन त्याचे हद्दीत असलेल्या आयुध निर्माणी येथे जाणारा रेल्वे ट्रॅक वरील पोल क्र. १०७३/ओएस १० ते ११ या दरम्यान असलेल्या उपरी उपसर तांब्याचा तार ५ किमी लांब व ४० किलो वजनाचा कि. १०,०००/रु. चा माल कोणीतरी आज्ञात चोराने चोरून नेल्याने फिर्यादी रतिराम मार्कंड भेलावे वय ४३ वर्ष रा. ज्युनियर ईलेक्ट्रीक रेल्वे कॉलोनी देव्हाडी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भाजीपाले पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत

**२) अश्लिल शब्दात शिवीगाळ करून विट फेकुन मारून जखमी करून केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १८/०६/२०१८ चे १८.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचा मुलगा हेमंत वय १६ वर्ष हा इतर मुला सोबत व आरोपीचा मुलगा हरदु याचे सोबत खेळत असतांनी मुले घरा शेजारील खड्डयात दगड टाकीत असता त्यांना दगड कशाला घालीत आहात असे हटकले असता, व कोणीतरी मुलाने फिर्यादीच्या मुलाला दगड फेकुन मारला म्हणुन त्याने तोच दगड उचलुन खेळत असलेल्या मुलाला मारले त्यामुळे आरोपीने घटना ता. वेळी व ठिकाणी माझ्या पुतण्याला दगड लागला असता तर असे बोलुन शिवीगाळ करीत असतांना फिर्यादीने आरोपीला 'तु माझ्या मुलाला कशाला मारशील' असे बोलल्याने फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ करून विट फेकुन मारले व जखमी केले व हातात कुऱ्हाड घेवुन फिर्यादीचे घरात घुसुन मान धरून घरातुन ओढत घराबाहेर आणुन मारपीट केल्याने फिर्यादी ललीता लालचंद धनजोडे वय ४० वर्ष रा. ब्रम्ही यांचे बयान व डॉ. एमएलसी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ४५२,५०९,३२३,५०६ भादंवि.अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चुटे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत

**३)संगनमत करून उधारीचे पैसे दिले नाही म्हणुन लाथा बुक्यांनी मारपीट करून शिवीगाळ केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १५/०६/२०१८ चे २०.०० वाजता दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीचे अंगनात जावुन तु आमच्या पानठेल्याचे उधारीचे पैसे, उसनवार पैसे दिले नाही असे बोलुन शिवीगाळ करून त्याची शेळीचे पाठ त्याचे घरी नेत असता, फिर्यादी व तिचे पतीने त्यांना मना केले असता, आरोपीतांनी फिर्यादी व तिचे पतीस लाथाबुक्यांनी मारपीट केल्याने फिर्यादी सौ. पारबताबाई पुरूषोत्तम गोधळे वय ६० वर्ष रा. जैतपुर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ४४८,३२३,५०४,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. बागळे पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

**४) क्षुल्लक कारणवरून शिवीगाळ करून मारहान करून जिवाने मारण्याची पिटण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १९/०६/२०१८ चे २१.३६ वाजता दरम्यान यातील फिर्यादी व आरोपी हे एकाच गावचे असुन रिस्तेदार असुन घराशेजारी राहतात यातील फिर्यादीने आरोपी यास तु अंगावर सायकल का आणलास असे हटकले असता, आरोपी याने फिर्यादीस शिवीगाळ करून मारहान केले त्यामुळे कपाळाला, नाकाला जखम झाली असुन जिवाने मारण्याची पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी मधरू पंधरू आवरी वय ५४ वर्ष रा. गोसे यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३२४,५०४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गिन्हेपुंजे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**५) चाकुने पाठीवर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १९/०६/२०१८ चे १३.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीने फिर्यादी पत्नीचे चारित्र्यावर संशय घेवुन चाकुने पाठीवर मारून जखमी केल्याने फिर्यादी सौ. शिल्पा पारस शेंडे यांचे वय ३२ वर्ष रा. मुंडीकोटा जि. गोंदिया ह.मु. रवीदास वार्ड तुमसर यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३२४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चिचखेडे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**६) मोटार सायकलच्या धडकेत दोन जखमी :–**

दिनांक १९/०६/२०१८ चे ११.१५ ते ११.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी व जखमी युवराज धनराज चौधरी हे मोटार सायकल क्र. एमएच ३६ डब्ल्यु ८१४६ वर डबल सिट बसुन एनएच ६ मेन रोडने सेंदुरवाफा आयटीया कॉलेज कडे जात असता, पेट्रोलपंचे सर्वीस रोडने येणा–या यातील आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने लापरवहीने चालवुन फिर्यादीचे मोटार सायकलला धडक मारून फिर्यादी व युवराज चौधरी यांना व स्वत: जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने जखमीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७,३३८ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**७) अल्पवयीन मुलीला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १५/०६/२०१८ चे ११.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १४ वर्ष, ही सुट्टया असल्याने गावाला जाते म्हणुन घरून निघुन गेली तिच्या नातेवाईकात शोध घेतला असता, मिळुन आली नाही तिला कोणीतरी अज्ञात इसमाने पळवुन नेले असावे असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३६३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गाडवे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**८) उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक १९/०६/२०१८ चे ००.३० वाजता मृतक देवराम मघरू वघारे वय ५३ वर्ष रा. सेलोटी याने अति जास्त प्रमाणात दारू पिवुन बेशुध्द अवस्थेत पडल्याने त्यास औषधोपचारा करीता सा. रू. भंडारा येथे दि. १५/६/२०१८ ला भरती केले असता उपचारा दरम्यान दि. १९/६/२०१८ ला मरण पावल्याने पो.स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ.चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. पठाण यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अवये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**९) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

**अ)** दिनांक १९/०६/२०१८ चे १७.४० ते १८.३५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील यामाह पॅशीनो मोटार सायकल ही बावनकर चौक तुमसर येथे सार्वजनिक रोडवर मधोमध उभी करुन येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. ठवरे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. ठवरे पोलीस स्टेशन तुमसर करीत आहेत.

**ब)** दिनांक १९/०६/२०१८ चे १७.०० ते १८.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील टाटाएस वाहन बजाज नगर बावनकर चौक तुमसर येथे सार्वजनिक रोडवर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा कंळबे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा कंळबे पोलीस स्टेशन तुमसर करीत आहेत.

**१०) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १९/०६/२०१८ चे १७.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील बोलेरो गाडी ही दवाखाना चौक गोबरवाही येथे सार्वजनिक रोडवर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. इंगोले यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. इंगोले पोलीस स्टेशन गोबरवाही करीत आहेत.

**११) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवीतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक १९/०६/२०१८ चे ३०.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन दारू पिवुन दारूचे नशेत त्रिमुर्ती चौक भंडारा येथे चालवीतांनी मिळुन आल्याने त्याचे श्वासाचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन द्वारे नमुना घेतला असता, अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. हटवार वा.नी.शा. भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पोना. साबळे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

१२ ) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक १९/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०६, तीन सिटर वाहनाकरीता– १८ ईतर वाहनांवरती – ९० केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.